
इतिहास

पुनर्जन्मावर आधारित अशोककुमार निर्मित महल



छाया: कांती ठक्कर

मधुमती हा काही पुनर्जन्मावर आधारित पहिला चित्रपट नाही. महल त्याअगोदर बनला. अशोककुमारच्या निर्मितीतला हा तिसरा चित्रपट कसा बनला!

❑ इसाक मुजावर

पुनर्जन्माच्या कथेवरील चित्रपटांचा विचार करताना आजही सर्वांना ठळकपणे आठवणारा चित्रपट म्हणजे १९५८ चा विमल रॉय यांचा *मधुमती*. या चित्रपटाच्या यशानंतर पुनर्जन्माच्या कथेवरील अनेक चित्रपट आपल्याकडे निर्माण झाले. आजही निर्माण होत आहेत. उद्याही निर्माण होत राहतीलच. पण *मधुमती* काही पुनर्जन्माच्या कथेवर निर्माण झालेला आपल्याकडील पहिला चित्रपट नव्हे. त्याआधी पुनर्जन्माच्या कथेवरील एक चित्रपट आपल्याकडे निर्माण झाला होता. हा चित्रपट म्हणजे १९४९चा बॉम्बे टॉकीजचा *महल*. बिमल रॉय या चित्रपटाचे संकलक होते. हे बिमल रॉय म्हणजे *मधुमती*चे निर्माते-दिग्दर्शक बिमल रॉय नव्हेत. निर्माता-दिग्दर्शक बिमल रॉय मूळचे छायालेखक. नंतर ते छायालेखकाचे दिग्दर्शक बनले आणि मग निर्माता. संकलक बिमल रॉय मात्र शेवटपर्यंत संकलकच राहिले. बॉम्बे टॉकीजच्या अनेक चित्रपटांचे संकलन त्यांनी केलं. ते *महल*चे संकलक होते. अशोककुमार व सावक वाच्छा या चित्रपटाचे निर्माते होते. बॉम्बे टॉकीजच्या चित्रपटानीच अशोककुमारला हिंदी चित्रपटातला एक लोकप्रिय नायक बनवलं. १९४४ साली बॉम्बे टॉकीजमध्ये फाटाफूट झाली. अशोककुमार तेव्हा शशधर मुखर्जी, ग्यान मुखर्जी, रायबहादूर चुनीलाल, सावक वाच्छा यांच्याबरोबर बॉम्बे टॉकीजमधून बाहेर पडला. आणि फिल्मीस्तान या चित्रसंस्थेचा सवतासुभा त्याने उभारला. बॉम्बे टॉकीजला त्यानंतरच्या काळात घरघर लागली होती. ती पाहून अशोककुमारला त्याला घडवणाऱ्या या चित्रसंस्थेविषयी एक ममत्व वाटू लागलं. या ममत्वातूनच सावक वाच्छाना आपल्याबरोबर घेऊन तो फिल्मीस्तानमधून बाहेर पडला आणि १९४७ ला बॉम्बे टॉकीजचा त्याने पुन्हा ताबा घेतला. त्याने व सावक वाच्छानी बॉम्बे टॉकीजच्या बॅनरखाली निर्माण केलेला पहिला चित्रपट *मजबूर*. १९४८ ला हा चित्रपट आला होता. *मजबूर* पाठोपाठ १९४८ लाच आला *जिद्दी*. अशोककुमार तेव्हा ज्याच्या नावाला ड्रॉ आहे, असा आपल्या चित्रपटातला एक लोकप्रिय नायक होता. तरीही बॉम्बे टॉकीजच्या बॅनरखाली स्वतः निर्माण केलेल्या *मजबूर* व *जिद्दी* या दोन्ही चित्रपटात त्याने स्वतः नायकाची भूमिका केली नव्हती. *मजबूर*चा नायक होता अभिनेता स्वर्गीय श्याम आणि *जिद्दी*चा नायक होता देव आनंद.

मजबूर व *जिद्दी* पाठोपाठ १९४९ ला आला *महल*. बॉम्बे टॉकीजचा ताबा घेतल्यानंतर अशोककुमारने निर्माण केलेला तिसरा चित्रपट. तो स्वतः या चित्रपटाचा नायक होता. *मजबूर* व *जिद्दी*नंतर या चित्रपटातील नायकाच्या भूमिकेपासूनही सुरुवातीला त्याला दूर राहायचं होतं. मधुबाला या चित्रपटाची नायिका होती. १९४७ च्या *नीलकमल*पासून तिची नायिकेची कारकीर्द सुरू झाली होती. पण १९४८पर्यंत एकाही लोकप्रिय नायकाबरोबर नायिकेची भूमिका करायचं भाग्य तिला लाभलं नव्हतं. याचं शल्य तिला बोचत होतं. यामुळेच *महल*च्या नायिकेची भूमिका तिला ऑफर झाली तेव्हा या चित्रपटात आपल्याबरोबर नायकाची भूमिका करायची गळ तिने अशोककुमारला घातली. तिच्या आग्रहामुळेच या चित्रपटातील नायकाची भूमिका अशोककुमारला करावी लागली.

बॉम्बे टॉकीजचं एक सूत्र होतं. चांगला लेखक दिग्दर्शकदेखील बनू शकतो. ग्यान मुखर्जी, अमिया चक्रवर्ती, किशोर साहू, नजम नक्वी यासारखे काही लेखक यामुळेच बॉम्बे टॉकीजच्या चित्रपटातून यशस्वी दिग्दर्शक बनले. लेखकांना दिग्दर्शक बनवायचं बॉम्बे टॉकीजचं हे सूत्रच अशोककुमार व सावक वाच्छा यांनी बॉम्बे टॉकीजचा ताबा घेतल्यावर पुढे चालू ठेवलं. लेखक कमाल अमरोहीना यामुळेच बॉम्बे टॉकीजमध्ये दिग्दर्शक बनायची संधी मिळाली. *महल* या चित्रपटात. या चित्रपटाची कथा देखील त्यांचीच होती. ते जन्माने मुस्लीम. पुनर्जन्म मुस्लीम धर्माला मान्य नाही. तरीही आपल्याकडील पुनर्जन्माच्या कथेवरील *महल* या पहिल्या चित्रपटाची कथा त्यांच्या लेखणीतून उतरली होती. या चित्रपटाचं हे एक ठळक वैशिष्ट्य होतं.



खेमचंद प्रकाश

मधुबालाची *महल*मधील भूमिका माळ्याच्या मुलीची होती. ती *महल*मध्ये आलेल्या अशोककुमारसाठी अनेकदा चहा घेऊन येते तेव्हा तिच्या डोक्यावर तिचा चेहरादेखील झाकोळून टाकणारा घुंघट असतो. या घुंघटमुळे या चित्रपटातील अनेक दृश्यात तिचा चेहरा दिसत नाही. चहा द्यायला पुढे आलेला हातच फक्त दिसतो. कमाल अमरोही एकदा कोणत्या तरी गावातील एका डाक बंगल्यात उतरले होते. तेव्हा एक तरुणी त्यांच्यासाठी चहा घेऊन यायची. जिचा चेहरा पूर्णपणे एका घुंघटखाली झाकला गेलाय अशी.

चहा देताना तिचे हातच फक्त दिसायचे. गोरेपान असे. *महल*मधील नायिकेची व्यक्तिरेखा आकाराला आणत असताना कमाल अमरोहींना ती आठवली आणि तिच्या आठवणीतूनच *महल*मधील मधुबालाची भूमिका त्यांनी आकाराला आणली.

*मधुमती*प्रमाणेच *महल*ची कथादेखील तीन जन्मांची होती. हा चित्रपट पडद्यावर आला तेव्हा सुरुवातीला *मधुमती*प्रमाणेच या चित्रपटाच्या शेवटी तिसऱ्या जन्मी नायक-नायिकेचं मीलन दाखवण्यात आलं होतं. *मधुमतीत* तिसऱ्या जन्मीचं हे मीलन चालून गेलं. पण *महल* तयार होऊन सेन्सॉरसमोर गेला तेव्हा... बाप रे बाप. तिसऱ्या जन्मीचं हे मीलन दाखवलं गेलं तर प्रेमात असफल झालेली अनेक प्रेमीयुगलं या जन्मी नाही तर नाही, पुढच्या जन्मी आपलं मीलन होईल. या वेड्या आशेने आत्महत्या करायला प्रवृत्त होतील, अशी भीती सेन्सॉरच्या काही सदस्यांना वाटली. आणि त्यांनी तिसऱ्या जन्मातील मीलनाचा हा भाग कापून टाकण्याचा आदेश दिला. पण बॉम्बे टॉकीजने काही हा आदेश मानला नाही. तो धाब्यावर बसवून हा चित्रपट त्यांनी जसाच्या तसा प्रदर्शित केला. सेन्सॉर बोर्डाचा एक सदस्य हा चित्रपट पाहायला चित्रपटगृहात गेला असता ही गोष्ट त्याच्या लक्षात आली. त्याने याची तक्रार केली असता या चित्रपटावर बंदी आली. ती उठवली जावी यासाठी बॉम्बे टॉकीजला सेन्सॉरसमोर झुकून तिसऱ्या जन्माचा भाग या चित्रपटातून कापून टाकावा लागला. आणि मगच सेन्सॉरच्या आक्षेपामुळे काही दिवसांसाठी चित्रपटगृहातून उतरवला गेलेला हा चित्रपट पुन्हा नव्याने पडद्यावर आला. सुखांत शेवटाऐवजी दुःखांत शेवट घेऊन.


*महल*मध्ये अशोककुमार - मधुबाला

अशोककुमार, मधुबाला यांच्याबरोबर *महल*मध्ये विजयालक्ष्मी, कुमार, कानू रॉय, एस. नजीर, ईरच तारापूर, शीला नाईक, नीलम, लीला पांडे यांच्या प्रमुख भूमिका होत्या. विजयलक्ष्मीने या चित्रपटात अशोककुमारच्या पत्नीची भूमिका केली होती आणि कुमारने अशोककुमारच्या पित्याची. या कुमारची भूमिका असलेला एक चित्रपट *पूरण भगत* १९३३ला पडद्यावर आला होता. अशोककुमार काही तेव्हा चित्रपटात आलेला नव्हता. बी.एस्सी.ची पदवी घेऊन कॉलेजमधून बाहेर पडला होता आणि आयुष्यात काहीतरी बनण्यासाठी धडपडत होता. ही धडपड चालू असतानाच *पूरण भगत* त्याच्या पाहण्यात आला. तो पाहून आपण चित्रपटव्यवसायात जावं आणि छायालेखक बनावं, असं त्याला वाटू लागलं. म्हणून त्याचे मेहुणे शशधर मुखर्जी यांचा हात पकडून तो बॉम्बे-टॉकीजमध्ये दाखल झाला. तेथे तो छायालेखकाऐवजी नट बनला आणि महलमध्ये त्याला चित्रपटव्यवसायात येण्याची प्रेरणा देणाऱ्या पूरण भगतचा नायक कुमार याच्या मुलाची भूमिका त्याने केली. कानू रॉय या चित्रपटात अशोककुमारचा मित्र बनला होता. एस. नजीरने महलच्या माळ्याची भूमिका केली होती. ईरच तारापूरने गाईडची, शीला नाईक, लीला पांडे व नीलम या चित्रपटात नृत्यापुरत्याच होत्या.

नकराव या चित्रपटाचे गीतकार होते. व संगीतकार खेमचंद प्रकाश. त्यांच्या संगीतात लताने या चित्रपटात गायलेल्या 'आयेगा आनेवाला...' या गाण्याने आपल्या चित्रपट संगीतात हॉटिंग गाण्यांचा एक नवा ट्रेण्ड सुरू केला. या चित्रपटातील गाण्यातून नंतरच्या काळातील अनेक चित्रपटांच्या टायटल्स निर्माण झाल्या. 'आयेगा आनेवाला...' या गाण्याचा मुखडा घेऊन १९६७ ला *आयेगा आनेवाला* या नावाचा एक चित्रपट आला होता. शीला नाईक व लीला पांडे यांच्यावर चित्रित झालेलं व जोहराबाई अंबालावाली व राजकुमारी यांनी गायलेलं एक नृत्यगीत या चित्रपटात होतं– 'छुन छुन घुंघरवा बाजे ये रात फिर न आयेगी...' या गाण्याचा मुखडा घेऊन १९६६ ला *ये रात फिर न आयेगी* नावाचा एक चित्रपट आला होता. राजकुमारीने या चित्रपटातील 'घबराके जो हम, सरको टकगए तो अच्छा हो...', 'मैं वो हसी हूं लब पे जो आने से रह गयी...' व 'एक तीर चला, दिल पे लगा, हाय मेरा दिल...' ही तीन गाणी गायली होती. या तीन गाण्यांपैकी 'हाय मेरा दिल...' या गाण्याचा मुखडा घेऊन १९६८ला *हाय मेरा दिल* या नावाचा चित्रपट आला होता. *आयेगा आनेवाला*बरोबरच लताने या चित्रपटातील 'मुश्कील है बहुत मुश्कील चाहत को भुला देना...' व 'दिल ने फिर याद किंया, बेवफा लौटके आ...' ही मधुबालावर चित्रित करण्यात आलेली आणखी दोन गाणी गायली होती. या गाण्यांपैकी 'दिल ने फिर याद किया...' या गाण्याचा मुखडा घेऊन १९६६ला या नावचा एक चित्रपट आला होता. या चित्रपटाच्या वेळी संगीतकार खेमचंद प्रकाश यांची प्रकृती खालावत चालली होती आणि चित्रपट संगीताचा रंगदेखील हळूहळू बदलत चालला होता. या बदलत्या रंगात महलचे संगीत कितपत चालेल याची अनेकांना शंका वाटत होती. बॉम्बे टॉकीजमधील एका महाशयांनी तर हा चित्रपट पडला तर तो केवळ संगीतामुळे पडेल, असा शेरा मारला होता आणि तो खेमचंद प्रकाश यांना चांगलाच झोंबला होता. यामुळे महल पडद्यावर आला तेव्हा प्रकृती साथ देत नसतानाही ते पहिल्या शोला आले आणि या चित्रपटातील संगीताला मिळणारा रिस्पॉन्स पाहून या संगीताला नाक मुरडणाऱ्या महाशयाना त्यांनी सुनावलं, 'लक्षात ठेवा. चांगल्या संगीताला कधी मरण नसतं.'

*महल*च्या संगीताचं यश खेमचंद प्रकाश यांच्या आयुष्यातील शेवटचं यश. १९४९ला हा चित्रपट आला आणि १९५०ला खेमचंद प्रकाश यांच निधन झालं. पार्श्वगायिका पूर्णिमा तथा सुषमा श्रेष्ठ हिचे वडील भोला श्री श्रेष्ठ यांनी *महल*च्या संगीतात तबला वाजवला होता, लछू महाराजनी या चित्रपटाचं नृत्य दिग्दर्शन केलं होतं.

पुनर्जन्माच्या कथेवरील *मधुमतीचं* जास्तीत जास्त चित्रण आऊटडोअरला करण्यात आलं होतं. यामुळे निसर्गाच्या सुंदरतेचा सौंदर्य या चित्रपटाला लाभलं होतं. *महल*मध्ये या सौंदर्याचा अभाव होता. कारण मोटार पा सिंगच्या एक दोन दृश्यांचा अपवाद वगळता या चित्रपटाचं जास्तीत जास्त चित्रण स्टुडिओत सेट उभारून इनडोअरला करण्यात आलं होतं. ☆